# श्रीमती इंदिरा गांधीची कामगिरी

**डॉ. पी.बी. सिरसट**
पि.वि.पी. कॉलेज,
ता. पाटोदा, जि. बीड.

श्रीमती इंदिरा गांधी यांचा जन्म १९ नोव्हेंबर १९१७ रोजी नेहरू यांच्या प्रतिष्ठित कुटूंबात झाला. त्यांचे शिक्षण वेगवेगळ्या ठिकाणी झाला स्विझरलैंड जिनेवा, पुणे व मुंबई स्थित प्युपल्स स्कूल, बैडमिंटन स्कूल, विश्वभारती, शांति निकेतन, ऑक्सफोर्ड या सारख्या प्रमुख नामवंत संस्थातून शिक्षण घेतले. श्रीमती इंदिरा गांधी सुरवातीपासूनच स्वातंत्र्य संग्रामात सक्रिय होत्या. बालपणी त्यांनी 'बाल चरखा संघ' स्थापन केला होता. तर १९३० मध्ये लहान मुलांच्या साथीने 'वानर सेना' उभी केली होती.

२६ मार्च १९४२ रोजी श्रीमती इंदिरा गांधींनी फिरोज गांधी यांच्याशी विवाह केला. १९५६ मध्ये अखिल भारतीय युवा काँग्रेस तसेच 'एआयसीसी' महिला विभागाच्या अध्यक्ष झाल्या. आपल्या जीवनात अनेक क्षेत्रात लौकिक प्राप्त केला होता. १९७२ मध्ये भारतरत्न पुरस्कार तसेच बांगलादेश मुक्तीकरति मेक्सिकन अकादमी पुरस्कार १९७३ मध्ये FAO चे दुसरे वार्षिक पदक मिळाले होते. तसेच अमेरिकेने मदर पुरसकार दिला होता. मुसद्देगिरीतीस उत्कृष्ट कार्या बद्दल इटालीने 'इसाबेला डी इस्टे' पुरस्कार दिला हेता. श्रीमती इंदिरा गांधी जगातील सर्वात लोकप्रिय महिला होत्या. श्रीमती इंदिरा गांधी यांनी मोरारजी देसाई यांचा पराभव करून त्या २४ जानेवारी १९६६ रोजी भारत देशाच्या पंतप्रधान बनल्या. तेंव्हा त्यांच्या पुढे अनेक राजकीय व आर्थिक समस्या व प्रश्न निर्माण झालेले होते.

(१) इ.स. १९६२ चे भारत चीन युध्द त्यामुळे आर्थिक परिस्थिती हलाखीची होती.
(२) अन्नधान्याची टंचाई वस्तूंच्या किंमती वाढल्या होत्या.
(३) पंजाबच्या मागणीसाठी दंगली झाल्या होत्या.
(४) अमेरिका, पाकिस्तानला शस्त्र पुरवठा करीत होता.
(५) काँग्रेस पश्चात दोन गट होते. सिंडिकेट गट उजवा व इंडिकेट डावा या गटावर अवलंबुन रहावे लागत होते.

प्रारंभी इंदिराजींना लोकसभेत प्रश्नांना उत्तर देता येत नव्हते. आत्मविश्वासाने त्यांना बोलता येत नव्हते. तेंव्हा विरोधक डॉ. राममनोहर लोहिया यांनी इंदिरा गांधी चे नामकरण 'गुंगी गुडिया' असे केले होते.

**अमेरिकेशी भेट :**

इंदिरा गांधी यांनी परिस्थितीवर उपाय काढण्यासाठी अमेरिकेशी हात मिळवणी केली. गांधी थेट अमेरिकेला भेट दिली. भेटीचा उद्देश अमेरिकेची आर्थिक मदत मिळवणे अन्न धान्याची मदत मिळवणे हा हेतू साध्य झाला. अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन होते. इंदिराची व अमेरिकेची वाटाघाटी झाल्या त्याचा फायदा भारताला झाला.

श्रीमती इंदिरा गांधी भारताच्या पंतप्रधान झाला नंतर पहिल्या अंतर्गत धोरणा भूमिका व देशाचा विकास करीत असतांना १४ प्रमुख बँकेचे राष्ट्रीय करण करण्यात आले. सामान्य माणसाला कर्जपुरवठा करता यावा. व्यापाराप्रमाण् शेतीसाठी व इतर ग्रामीण उद्योगांना पतपुरवठा व्हावा या साठी देशातल्या प्रमुख बँकावर सरकारने नियंत्रण असणे आवश्यक होते. १९ जुलै १९६९ रोजी देशातल्या १४ बँकाचे राष्ट्रीयकरण करण्यात आले.

बँकांच्या राष्ट्रीय करणामुळे पतपुरवठा धोरण बनले. सामान्य माणसाला कर्ज मिळू लागले. सामान्य व्यापारी नवा उद्योजक बँकाकडे आशेने पाहू लागला.

**गरीबी हटाव :**

आर्थिक समर्तांशिवाय राजकीय स्वातंत्र्याला अर्थ नसतो. याची जान पंतप्रधान इंदिरा गांधीला होती. म्हणून ३० जूलै १९६५ ला १० कलमी कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

(१) नवीन उद्योजकांना कर्ज पुरवठा करणे.
(२) उद्योगांना रोजगार उपलब्ध करून देणे.
(३) तरूणांना रोजगार उपलब्ध करून देणे.
(४) विदेशी गुंतवणूकीपासून मुक्त करणे.
(५) व्यापारी सवलतीचा गैरवापर टाळणे.

(६) दैनंदिन जीवनात लागणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करणे.

(७) उद्योगपतींची एकच श्रृंखला निर्माण करणे.

(८) अनाठाई खर्च टाळणे.

(९) तातडीने कर्जपुरवठा करणे.

(१०) मक्तेदारी क्षेत्रावर नियंत्रण ठेवणे.

या दहा कलमी कार्यक्रमामुळे देशाच्या विकासाला चालना मिळाली व गरिबी हटाव धोरण मोठ्या प्रमाणात इंदिरागांधींनी यशस्वी केले. ०१ जूलै १९७५ रोजी गांधीने आर्थिक समानता प्रस्थापित करण्यासाठी विशेषतः गरीबी हटवण्यासाठी २० कलमी कार्यक्रम हाती घेतला होता. या कार्यक्रमाचा सर्व सामान्य बेरोजगार गरीब व्यापारी इतर लोकांनामोठ्या प्रमाणात फायदा झाला व ही योजना यशस्वी झाली.

**पंजाब आणि ऑपरेशन ब्ल्यू स्टार :**

पंतप्रधान इंदिरा गांधीच्या कारकीर्दीत पंजाब प्रश्न आणि खलिस्तानाची फुटीरतावादी मागणी अधिक त्रस्त होती. भिंद्रानवाले यांनी अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात आश्रय घेतला होता. सुवर्ण मंदीर हे अतिरेक्याचे प्रमुख केंद्र बनले होते.

सुवर्णमंदीर हे खरे तर शिखांचे पवित्र श्रध्दास्थान पण या श्रध्दास्थानातच अतिरेक्यांचा अड्डा उभारण्यात आलेला होता. ज्यात शासन विरोधी व समाजविघातक अशा अतिरेकी चळवळीसाठी लागणारी शस्त्र, दारू गोळा साठवला गेला होता. ऑपरेशन ब्ल्यू स्टारने सुवर्ण मंदीरातील हा अतिरेकी गट नामशेष केला. व पंजाबचा प्रश्न सुटण्यास मदत झाली.

**इंदिरा गांधी आणि आणीबाणी :**

२६ जूनला २६ जून १९७५ ला पहाटे देशात अरजकता निर्माण होऊ नये म्हणून कलम ३५२ नुसार आणीबाणी जाहीर करण्यात आली.

भारतात सुरक्षा कायद्यासाठी वृत्तपत्र कार्यालय बंद करण्यात आले. आकशवाणी, दूरदर्शन, प्रचार माध्यमांवर कडक नियंत्रण आले. ०५ ऑस्ट १९७५ रोजी मेन्टेनन्स ऑफ इंटरनल सिक्यूरिटी अॅक्ट [MISA] लागू झाला. अंतर्गत संरक्षणाला धोका निर्माण झाला म्हणून विना चौकशी माणसाला तुरूगात टाकण्यात येऊ लागले. अन्यायाविरूध्द अत्याचारांविरूध्द कुठे ब्र उच्चारण्याची ताकद कुणात उरली नाही. सारा आवाज दाबला गेला.

आणीबाणीचा परिणाम झाला.

(१) सत्तेचा केंद्रीकरणामुळे सत्ता भ्रष्ट झाली.

(२) वृत्तपत्रावरील निर्बंध लागणारे कायदे लागू करण्यात आले.

(३) अनेक ख्यातनाम नेत्यासह हजारे कार्यकर्ते तुरूंगात टाकण्यात आले.

(४) प्रशसनाचा प्रचंड धाक प्रस्थापित झाला.

(५) एक प्रकारचे शिस्त पर्व उवतरले.

(६) स्वातंत्र्याचे मोल नव्याने जाणवले.

(७) काँग्रेस विषयी लोकांच्या मनात राग निर्माण झाला.

(८) कुटूंब नियोजनाची सक्ती करण्यात आली.

आणीबाणीमुळे इंदिरा गांधीची सत्ता अबाधित राहिली. एक प्रकारचे शिस्तपर्व देशात अवतरले होते. अराजकता पासून देश वाचला होता. पण त्याच बरोबर काही अनिष्ठ प्रवृत्ती ही रुजल्या होत्या.

**अंतराळ संशोधन कार्य :**

पंतप्रधान पंडित नेहरूंनी १९५१ मध्ये विज्ञानाच्या सर्वत्र क्षेत्रात संशोधन व्हावे म्हणून राष्ट्रीय प्रयोग शाळा, तंत्रज्ञान स्थापन करून संशोधनाला चालना दिली होती. डॉ. विक्रम साराभाई यांच्या नेतृत्वाखाली अवकाश युगाची सुरूवात झाली होती. श्रीमंती इंदिरा गांधींनी १९६९ मध्ये भारतीय आवकाश संशोधन संस्था स्थापन केली. १९७२ मध्ये स्पेस डिपार्टमेंन्ट न स्पेस कमिशनची नियुक्ती केली व संशोधनाला प्रोत्साहन दिले. पुढे ३६० कि.लो. ग्राम वजनाचा आर्यभट्ट हा उपग्रह ९ एप्रिल १९७५ रोजी अवकाशात सोडण्यात आले. नंतर भास्कर - १, भास्कर - २ रोहिणी हे उपग्रह सोडण्यात आले. या प्रकारे श्रीमंती इंदिरा गांधीने कार्य केले.

**पोलादी महिला म्हणून ख्याती :**

पाकिस्तानी लष्कराचे जनरल याह्याखान यांच्या हुकूमशाही राजवटीतून बांगला देशाला मुक्त करण्यात इंदिराजींनी महत्वाचा पुढाकार घेतला होता. बांगला देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात इंदिराजींची भूमिका महत्वाची होती. पाकिस्तानाच्या लष्करी अत्याचाराला कंटाळून सुमारे एक कोटी निर्वासित बांगलादेशी भारतात आश्रयासाठी आले. त्यांना भारतात आश्रय देण्याचे काम केले.

पाकिस्तानी लष्करशाही राजवटीचे खरेखुरे चित्र जगापुढे ठेऊन पाकिस्तानच्या आंतरराष्ट्रीय पातळीवर एकाकी पाडून अशा धाडसी निर्णयामुळे त्यांची जगात पोलादी महिला म्हणून ख्याती होती. नवनिर्मित बांगला देशाचे अध्यक्ष मुजिबूर रहेमान म्हणाले होते की, "इंदिराजी केवळ भारतीय जनतेच्या नेत्या नव्हे तर अखिल मानव जातीच्या नेत्या होत्या."

**इंदिराजींचे परराष्ट्र धोरणावर प्रभुत्व :**

भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडून परराष्ट्र धोरण कसे हाताळायचे विदेशी नेत्यांशी कसा संवाद साधावयाचा याचे धडे इंदिराजींने घेतले होते. परदेशी शिष्टमंडळाशी कशा प्रकारे चर्चा करावी यात त्या पारंगत होत्या. पश्चिमात्य जगतातील बड्या नेत्यांचा विश्वास संपादन केला होता.

अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन सारख्या विकसित राष्ट्रांना त्यांनी भेटी व तेथील नेत्यांशी केलेल्या वाटाघाटी यातून भारताची नेमकी प्रतिमा बसविण्यात त्या यशस्वी झाल्या.

इंदिराजी अलिप्तवादी व विकसनशील देशांच्या खऱ्या पुरस्कर्त्या होत्या. १९८३ मध्ये जगातील तटस्थ राष्ट्रांच्या गटाच्या अध्यक्षपदी इंदिराजींची बिनविरोध निवड होणे. ही त्यांच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील कामगिरीचा फलश्रुती होती. १९६४ मध्ये लंडन येथे झालेल्या राष्ट्रकुल परिषदेत भारत-आफ्रो, आशियाई देशामध्ये मैत्री व सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्यात इंदिराजींनी मोलाची भूमिका बजावली.

**इंदिरा गांधींची हत्या :**

दहशतवाद्यांचे सुवर्ण मंदीरातून उच्चाटन करण्याकरिता लष्करी कार्यवाहीचा आदेश देण्यात आला. पण इकडे शिखांची दहशतवादी संघटनांनी ऑपरेशन ब्ल्यू स्टार तयार केला होता. तो इंदिरा गांधींवर सुड उगवण्यासाठी इंदिरागांधींचे पुत्र राजीव गांधींना जीवे मारण्याच्या धमक्या येऊ लागल्या. आपली हत्या होणार याची पूर्ण कल्पना इंदिराजींना होती. मृत्युपूर्वी दोन दिवस अगोदर ओरिसाच्या दौऱ्यात एका विशाल सभेला बोलतांना त्या म्हणाल्या होत्या.

"माझी हत्या होईल याची मला चिंता नाही. कारण माझ्या रक्ताच्या प्रत्येक थेंबाने भारताला ऐक्य सामर्थ्य व स्फूर्ती मिळेल."

इंदिराजींची हत्या ३१ ऑक्टोबर इ.स. १९८४ रोजी करण्यात आली याचे मारेकरी होते. बियंतसिंग व संतवंतसिंग होते. संपूर्ण भारतदेश त्या धक्क्याने सुन्न झाला होता.

पंतप्रधान इंदिरा गांधींच्या निधनाने आधुनिक भारताच्या इतिहासातील एका महत्वाच्या कालखंडाचा करुण अंत झाला.

**निष्कर्ष :**

(१) भारताच्या पहिलया महिला पंतप्रधान म्हणून श्रीमंती इंदिरा गांधीची निवड झाली.

(२) १४ बँकांचे राष्ट्रीय करण इंदिराजीने केले. याचा जन सामान्य माणसाला फायदा झाला.

(३) आर्थिक समतेशिवाय राजकीय स्वातंत्र्याला अर्थ नसतो. याची जान इंदिराजींना होती.

(४) गरीबी हटाव धोरणाची घोषणा १० कलमी कार्यक्रम लागू करण्यात आला.

(५) वैज्ञानिक आणि आणुशक्ती मुळे देशाच्या विकासात भर घालण्याचे धोरण निर्माण झाले.

(६) इंदिराजींची पोलादी महिला म्हणून जगात ख्याती निर्माण झाली.

(७) भारत देशासाठी बलीदान देणारी महिला ठरली.

**संदर्भ ग्रंथ :**

(१) स्वातंत्र्य भारताचा इतिहास - डॉ. पिपलापल्ले आर.आर., डॉ. रामभाऊ मुरकुटे

(२) पाथेय भाग - २ - डॉ. सहदेव चौगुले

(३) इंदिरा गांधी - पुपुल जयकर

(४) आधुनिक भारत - डॉ. साहेबराव गाठाळ

(५) भारतीय थोर विचारवंत - वि.ग. स्वामी